**अनामिका**

गेल्या २५-३० वर्षांत स्त्रियांचं समाजातील स्थान खूप बदललं. स्त्री-पुरुष समानता आपल्या समाजात बरीच रुजली आहे. काळ बदलतो तसं समाजातील प्रश्नांचं स्वरूप बदलत जातं किंवा वेगळे प्रश्न निर्माण होतात. या बदललेल्या काळातील संदर्भांवर आधारित लघुकथांचा संग्रह अलीकडेच प्रकाशित झाला – 'अनामिका'.

मंजुषा गोसावी यांनी लिहिलेलं हे दुसरं पुस्तक. पहिलं पुस्तक 'शिवा डान्सिंग' हे भारती कर्चनर यांनी याच नावाने लिहिलेल्या कादंबरीचं भाषांतर. अतिशय वेगळ्या विषयावर असलेल्या या अनुवादित कादंबरीच्या यशानंतर मंजुषा गोसावी यांचा हा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे.

या संग्रहातील बहुतेक कथा स्त्रीजीवनावर, त्यांच्या बदलत्या मानासिकतेवर आणि त्यातून उद्भवणाऱ्या परिस्थितीवर आधारित आहेत. सामान्य माणसांमधल्याच कितीतरी माणसांमध्ये असामान्यत्व असतं, ज्याची कुठेही दखल घेतली जात नाही. अशी माणसं आपल्याला समाजात खूप वेळा दिसतात. 'एंजल' कथेतली संगीता ही त्यातलीच. अतिशय अभिरुचीसंपन्न आयुष्य जगायची योग्यता असताना सुध्दा आपल्यावर पडलेल्या जबाबदाऱ्यांमुळे स्वतःच्या खाजगी आयुष्याचा त्याग करणारी संगीता ही खरोखरीच देवदूत आहे हे पटतं.

मॉडेलिंगचा निर्णय घेतल्यावर, ज्या जगात पदार्पण करायला एखादा मध्यमवर्गातील पालक अजूनही दोनदा विचार करतो, अशा परिस्थितीत एकटीने वाढवलेल्या आपल्या मुलीच्या पाठीशी सुमती उभी राहते अणि या बरबटलेल्या क्षेत्रात आपल्या मूल्यापासून न ढळताही काम करता येतं असा आत्मविश्वास देते.

पौगंडावस्थेत अणि अजाणत्या वयात आईच्या मानसिक आधाराची गरज असताना लहान बहीण झाल्यामुळे नैराश्य आलेली आई अणि त्यातच वडिलांचा मृत्यू! त्यात लैंगिक शिक्षणाचा अभाव. अशा विचित्र मनःस्थितीत सापडल्याने लग्न संस्थेबद्दलच घृणा निर्माण झालेल्या संजीवनीची गोष्ट वाचून मन विषण्ण होतं.

एकीकडे ही परिस्थिती, तर दुसरीकडे स्त्रीभ्रूणहत्यांचा प्रश्न. गर्भजलपरीक्षेचा स्त्रीभ्रूणहत्या करण्यासाठी आज किती दुरुपयोग सुरू आहे हे आपण रोज वाचतच आहोत. आजही सुशिक्षित समाजात सर्रासपणे सुरू असलेल्या असल्या हीन दर्जाच्या घटना पाहिल्या की स्वतःला सुशिक्षित म्हणवणारा हाच समाज खरोखरच सुशिक्षित आहे का असा प्रश्न पडतो. 'पराभूत', 'गर्भसंस्कार' या कथा वाचून पैसा, शिक्षण या गोष्टी एखाद्याकडे असल्या तरी अपेक्षित सुसंस्कृतता त्याच्याकडे असेलच असं नाही असं वाटतं. किंबहुना त्याचा परस्परांशी संबंधच नाही असं

वाटू लागतं. सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या सगळ्या प्रश्नांच्या मुळाशी मुख्यत्वेकरून स्त्रियाच दिसतात. 'पराभूत' मधील लीनाची सासू मुलीचा गर्भ पाडायला भरीस पाडते आणि गर्भजल परीक्षा करायला लावून नातू झाल्यावर त्यात  कृतकृत्यता मानते यावरून ही मानसिकता बदलणार आहे की नाही अशी शंका येते.

दोन भिन्न संस्कृतींत असलेल्या फरकामुळे एकच गोष्ट दोन वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून बघितल्यामुळे त्या परिस्थितीत सापडलेल्या माणसाला किती वेगळ्या प्रकारचे आयुष्य जगायला लागते याचे उत्तम उदहारण म्हणजे 'कुंती' अणि 'पालवी' या दोन कथा. 'कुंती'तली सुजाता ही अनाथाश्रमात वाढलेली मुलगी. लहान असताना बस स्टॉपवर सापडलेली. योगायोगानेच वसुधा तिला आपल्या मुलांची गव्हर्नेस म्हणून अमेरिकेत घेऊन येते. तिथे बागेत तिला कॅथी नावाची तरुणी भेटते. लग्नाआधीच मित्रापासून झालेल्या मुलाला ती खेळायला घेऊन येत असते. परिचय वाढत जातो अणि एक दिवस कॅथी तिला सांगते की मी आता एक-दीड महिन्यांनी भेटेन. विल्यमशी, म्हणजेच मुलाच्या वडिलांशी लग्न केल्यावर! सुजाताला धक्काच बसतो. पण भारतात जन्मलेल्या कुंतीकन्येला, जिला संस्कृतीच्या पगडयामुळे टाकून दिलेलं असतं, तिला वाटू लागतं, आपल्याला पुनर्जन्म मिळावा अमेरिकेत. म्हणजे अनाथपणाचं शल्य मनात न बाळगता ताठ मानेने तरी जगता येईल.

तशीच दुसरी जान्हवी. 'पालवी' या कथेतली. वयाच्या पन्नाशीच्या आसपास भाचीला भेटायला ती अमेरिकेत येते. आपल्या भाचीचा मित्र अणि तिचा वाग्दत्त वर रॉबर्ट याला भेटते. दोघांचा विवाह आंतरधर्मीय असूनसुध्दा संस्कृतीत असलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यामुळे पटकन ठरतो. या पार्श्वभूमीवर तिला तिचं तरुणपण आठवतं. रुढींच्या बंधनाखाली असल्यामुळे, सुशिक्षित असूनही बुरसटलेल्या विचारांचा प्रशांत प्रेमात पडल्यानंतर लग्न या गोष्टीकडे फक्त व्यवहार म्हणून पाहतो आणि लग्नाला नकार देतो. त्यामुळे तिला लग्न या कल्पनेचाच तिटकारा येतो. पण विशाखा जेव्हा तिला प्रौढत्त्वातही लग्न करण्याचा सल्ला देते तेव्हा 'आयुष्यातल्या कोणत्याही क्षणी तुम्ही तुमचं आयुष्य परत नव्याने सुरु करू शकता' ही आशा जान्हवीच्या मनात पल्लवित होते. प्रत्येकाने आपल्या आयुष्यातला प्रत्येक क्षण, मग तो वयाच्या कोणत्याही टप्प्यात असो, आनंदाने जगावा यालाच जीवन म्हणतात हेच विशाखा पटवून देते.

गरीब-श्रीमंत या वर्गविग्रहामुळे दूर झालेल्या मेधा अणि सुधाताई अणि शेवटी अनामिका या व अशा स्त्रियांचे जीवन वेगवेगळ्या अंगांतून पाहिलेल्या कथा. लेखिकेने एकीकडे स्त्रियांच्या हळुवार मनाचा मागोवा घेतलाय तर दुसरीकडे 'कुतरओढ', 'स्वयंसिध्दा' या कथांमधून ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नांचा उहापोह केला आहे. स्त्रियांच्या प्रश्नांवरचे परिसंवाद, त्यावर स्त्रीसंघटनांनी सुचवलेले उपाय आपण वाचतो, पण प्रत्यक्षात ते अंमलात आणणं किती कठीण आहे हे लक्षात येतं. भ्रष्टाचार अणि महागाईने ग्रासलेल्या या समाजात स्त्रियांचे हे प्रश्न समजले अणि सोडवायचे असले तरी ते सोडवता येतील का, की भ्रष्टाचार अणि महागाई हेच खरे प्रश्न आहेत? एक प्रश्न सोडवायच्या ऐवजी त्यापेक्षा सुसह्य पण वेगळ्याच प्रश्नांचे परिणाम भोगलेले बरे अशी समाजात परिस्थिती आहे. प्रश्न साधे, सरळ, सोपे असूनही स्त्री संघटनांकडे त्याची उत्तरं नाहीत.

या पुस्तकात स्त्रिया आणि त्यांच्या समस्या, त्यांची मानसिकता हा समान धागा आहेच, पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे यातल्या प्रत्येक कथेचा शेवट अत्यंत सकारात्मक आहे. यातील प्रत्येक कथा एक प्रश्न मांडते, पण कथेच्या शेवटी लेखिकेने त्याचं उत्तर दिलंय. त्यामुळे हे पुस्तक वाचल्यावर स्त्री समस्यांबद्दल प्रबोधन होतंच पण त्यांच्यावरच्या उपायांबद्दल मार्गदर्शनही मिळतं. खर तर स्त्रियांवरचे प्रश्न हा रुक्ष विषय होऊ शकतो पण या कथासंग्रहात तो रुक्षपणा कुठेही येत नाही, उलट साहित्यिक मूल्यंही जपलेली आहेत याचा प्रत्यय येतो.

आजपर्यंत लिहिल्या गेलेल्या स्त्री विषयक साहित्याकडे पाहिलं तर त्यातल्या बऱ्याचशा कथा ग्रामीण जीवनावर नाहीतर उच्चभ्रू स्त्रियांवर, ज्यांच्या पायाशी सुखं लोळण घेत आहेत पण तरी त्यांना काहीतरी खुपतंय अशा मानसिक लाड करणाऱ्या विषयांवर निर्माण झाल्या. किंवा काही कथा प्रेमभंग, त्यामुळे आयुष्यभर झुरणाऱ्या स्त्रिया किंवा विवाहबाह्य संबंधांवर लिहिल्या गेल्या. सर्वसामान्य माणसाचे हे प्रश्नच नाहीत पण अशा कथा आवडणाऱ्यांचा आणि आपण या साहित्याचे वाचक आहोत म्हणजे आपण आधुनिक आहोत असं वाटणाऱ्यांचा, तथाकथित बुध्दिवाद्यांचा एक मोठा गट आहे. अनामिकेतल्या कथा यातल्या कुठल्याच पठडीत बसत नाहीत.

‘अनामिके’तल्या कथा जर पंचवीस वर्षांनी वाचल्या तर त्या काळातल्या लोकांना आजच्या सामाजिक जीवनाची कल्पना येईल.

नीलिमा वीरकर
nilima_virkar@yahoo.com
(पूर्वप्रसिध्दी : ‘रंगदीप’, २०११)

अनामिका

लेखिका - मंजुषा गोसावी (manjusha_gosavi@hotmail.com)

प्रकाशक - रोहन प्रकाशन